Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# महात्मा फुले यांचे आर्थिक विचार

**प्रा. वाघमारे दत्ता मनोहरराव**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
लालबहादुर शास्त्री महाविद्यालय,
आष्टी, ता. परतुर, जि.जालना

**प्रस्तावना :**

मानवी जीवनाला जशी रक्ताची गरज आहे तशीच देशाच्या जीवनात शेतीला महत्वाचे स्थान आहे भारत देश हा एक कृषिप्रधान देश म्हणून संबोधला जातो. ज्या देशातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती असतो त्या राष्ट्राचा विकासही शेतीवरच अवलंबून असतो. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे जरी झाली असली तरीसुद्धा आपल्या देशातील शेतकरी वर्गाचे प्रश्न अजूनसुद्धा सुटलेले दिसत नाहीत. भारतीय शेतकरी वर्ग आजही दयनीय, दारिद्य, कर्जबाजारीपण व निसर्गाच्या कृपेवर जगतो. म्हणजेच शेतकरी आजही सुखी व समाधानी नाहीत. कारण आपल्या महाराष्ट्रात शेतकरी आजही आत्महत्या करीत आहेत ही फार दुर्दैवाची बाब आहे.

महात्मा फुले यांनी आपल्या 'शेतकऱ्याचा असूड' आणि 'इशारा' ग्रंथांमध्ये भारतीय शेतकऱ्यांच्या शेतीविषयी विचार मांडले आहेत. फुले यांनी शेतकऱ्यांविषयी चिंतन, मनन करून सखोल विवेचन केलेले दिसून येते. 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथातील पाचही प्रकरणांमध्ये शेतकी जीवनाचे खरे व वास्तव दयनीय चित्र रेखाटले आहे. तसेच शेतीची दुरवस्था का झाली आणि शेतकरी दरिद्री बनला यी कारणमीमांसा महात्मा फुले यांनी केली त्याचबरोबर या दोन्हींवर उपायही सुचविले आहेत. महात्मा फुले यांनी असे प्रतिपादन केले होते की, कोणत्याही राष्ट्राचे तीन आधारस्तंभ असतात ते म्हणजे -

१) राष्ट्रातील शेतकरी,

२) सैनिक,

३) प्रशासकीय वर्ग.

या तीन आधारस्तंभांवरच देशाची परिस्थिती अवलंबून असते. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीला फार महत्त्वाचे स्थान आहे. कारण शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा 'कणा' समजला जातो. शेतीच्या प्रगतीवरच देशाची प्रगती अवलंबून आहे. महात्मा फुले यांनी असे विचार मांडले की, शेतकऱ्यांचे जीवन दारिद्र्यात, कर्जफेडीत जाते. एवढेच नव्हे तर त्यांचा अंतही दारिद्र्यातच होत असे. महात्मा फुले यांनी शेतकऱ्याची स्थिती होण्याची काही कारणे सांगितली आहेत ती पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची कारणे :**

१) **जमिनीचे तुकडीकरण व विभाजन** :- भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधान आहे आणि भारतामध्ये वारसाहक्क पद्धतीमुळे संयुक्त कुटुंबपद्धतीचा ऱ्हास होत चालला आहे. म्हणजे विभक्त कुटुंबाच्या वाटपामुळे शेतजमिनीचे लहान लहान तुकडे पडत आहेत. त्यामुळे शेतजमिनीच्या लहान तुकड्यांवर आपला उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे.

२) **शेतकऱ्यांचे विविध मार्गांनी शोषण** :- शेतकऱ्यांच्या दारिद्र्यामध्ये भर टाकणारी महत्त्वाची विविध कारणे आहेत. दुष्काळ, उपासमारी, शेतकऱ्यांचे अज्ञान, निरक्षता या शोषणाच्या जोडीलाच धार्मिक विधींचा आणि कर्मकांडांच्या नावाखाली शेतकरी वर्गाची लुबाडणूक वेगळीच होती. त्यातून अशिक्षित शेतकरी लुबाडला जाई. तसेच सन १८८६ मध्ये ब्रिटिश शासनाने शेतसारा मोठ्या प्रमाणात वाढविला व सन १८७७-१८७८ मध्ये दुष्काळ आणि जागतिक महामंदी इत्यादी कारणांमुळे शेतमालाच्या किमती कमी झाल्या. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न घटले. आपला उदरनिर्वाह करण्यासाठी त्यांना आपली जनावरे विकावी लागली. शेत तारण ठेवावे लागले. शेती तारण ठेवताना अज्ञानी शेतकऱ्यांनी सरकारी अधिकारी, सावकार यांनी फसवणूक केली व शेतकऱ्याच्या जमिनी हडप केल्या.

३) **करामध्ये अतिरिक्त वाढ** :- ब्रिटिश भारतात स्थिर झाल्यानंतर त्यांनी कररचनेत फार बदल केले. जमीन महसूल करात अतिरिक्त वाढ केली. संपूर्ण शेतमालाची विक्री करूनदेखील शेतसारा भरणे शेतकऱ्यांना शक्य होत नसे. त्यामध्ये सत दुष्काळ पडत होते. वाढती महागाई आणि साथीचे रोग यामुळे शेतकऱ्यां जीवन जगणे अवघड झाले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या दारिद्र्यात भरच पडली.

४) **शिक्षणाचा अभाव किंवा निरक्षरता** : भारतीय समाजात शिक्षणाचे प्रमाण अल्प होते. कारण समाजातील विशिष्ट वर्गच शिक्षित होता; परंतु इतर जातीतील वर्ग मात्र अशिक्षित व अज्ञानी होता. त्यांच्यामध्ये अंधश्रद्धा व गैरसमजुती होत्या. त्यामुळे शेतकरी दारिद्र्यात पिचत पडले.

५) **शेतीपयोगी जनावरांची हत्या** :- महात्मा फुलेंच्या मते, ब्रिटिश भारतात आल्यापासून शेतीक्षेत्राचे फारच नुकसान झाले. कारण ब्रिटिश कर्मचारी व अधिकारी मांसाहारी होते. मांसाहार करण्यासाठी शेतीपयोगी पशूधनाची हत्या करण्यास ते भाग पाडत. त्यामुळे मांसाहार करणाऱ्यांची संख्या वाढल्याने गाई-बैलांची हत्या होऊ लागली. शेतीच्या मशागतीसाठी बैलांची कमतरता जाणवत होती. याशिवाय भारतात पडणारे दुष्काळ व जनावरांचे साथीचे आजार आणि गुरांची चाऱ्याअभावी उपासमार होऊन गुरे मृत्युमुखी पडत होती. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले व शेतकरी दारिद्र्याचे जीवन जगू लागले.

६) **ब्रिटिश प्रशासनाचा खर्च अवाढव्य होत्या :-** भारतीय शेतीच्या दुरवस्थेत महात्मा फुले यांनी ब्रिटिश प्रशासनासदेखील दोषी ठरवले. कारण ब्रिटिश शासनाच्या दरबारी जो सनदी अधिकारी वर्ग सैन्याधिकारी इंग्रज असून त्यांच्या वेतनावर मोठी रक्कम खर्च होत होती. याशिवाय त्यांना लागणाऱ्या सर्व वस्तू महागड्या होत्या. भारतीय नागरिकांना त्यांच्या तुलनेत खूपच कमी उत्पन्न मिळत होते. त्यामध्ये शेतीशी संबंधित असणाऱ्यांना तर अतिशय कमी उत्पन्न मिळत होते. ब्रिटिश अधिकारी व नोकरशहा चैनीचे जीवन जगत असताना भारतीय शेतकरी मात्र दारिद्र्यात दिवस काढतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे दारिद्र्य वाढतच राहिले.

७) **जागतिक मंदी :-** सन १८९० च्या नंतर जगाच्या जागतिक बाजारपेठेत फारच मोठी मंदीची लाट पसरली होती. भारतातील शेतमालांच्या किमती एकदम घटल्या होत्या. १८७१ मध्ये ज्वारीच्या पोत्याची किमत फक्त तीन रुपये एवढी कमी होती. परंतु १८७४ मध्ये तीच किंमत सव्वा रुपया पोते एवढी कमी झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न फारच कमी झाले. पण ब्रिटिश सरकारने शेतसारा मात्र माफही केला नाही. त्यामुळे शेतकरी दरिद्री बनले.

८) **आयात केल्या जाणाऱ्या वस्तू** :- ब्रिटनमध्ये यंत्रावर तयार होणाऱ्या वस्तू भारतात विक्री होऊ लागल्या. त्यामुळे भारतातील ग्रामीण भागातील छोट्यामोठ्या उद्योगांतील कारागीर, सुतार, लोहार इत्यादी लोकांना पूर्वीप्रमाणे काम राहिलेले नव्हते. त्यामुळे त्यांना सावकारांकडून कर्ज घ्यावे लागले.

९) **उत्पादनखर्च जास्त** :- भारतीय शेतकरी वर्ग हा शेती क्षेत्रात उत्पादन करते वेळी त्यांचा उत्पादनखर्च जास्त असतो व भारतीय शेती क्षेत्र हे कोरडवाहू असल्यामुळे पिकाची हमी नसे. त्यातून त्यांना सावकारांकडून कर्ज घेतल्याशिराय पर्याय उरत नाही. त्याकाळी सावकारांचे व्याजदर हे फार जास्त होते. अल्प रक्कम व्याजासह परतफेड करते वेळी खूप मोठी रक्कम द्यावी लागत होती. त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांना त्यांची परतफेड करणे फार कठीण होत होते. त्यामुळे शेतकरी दरिद्री होत असत.इत्यादी कारणे पाहिल्यानंतर फुले यांनी  शेतीची व शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना स्पष्ट केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे -

## शेती व शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी शेतकरी वर्गाला शिक्षण देणे फार आवश्यक आहे असे प्रतिपादन केले. कारण शेतकरी हा निरक्षर असल्यामुळे त्यांची सावकार, सरकारी अधिकारी आणि सवर्ण या तिन्ही वर्गांपासून फसवणूक होत होती. त्यामुळे त्यांना प्रथम विद्याज्ञान देणे फार महत्त्वाचे आहे. कारण विद्येशिवाय बुद्धीचा उपयोग होत नाही. ज्ञानाशिवाय शक्ती नाही, ज्ञान ही फार महान शक्ती आहे. म्हणजे ज्ञानाशिवाय व्यक्ती पशू बनतो. शेतकरी अज्ञानी, अशिक्षित असल्यामुळेच त्याचे व त्याच्या कुटुंबीयाचे विविध

स्तरांवर शोषण होते. हे कमी करण्यासाठी स्त्रियांना आणि कनिष्ठ समाजातील समाजाला शिक्षण द्यावे असे फुले यांनी स्पष्टपणे सांगितले. शेतकरी वर्गांना व त्यांच्या अपत्यांना शिक्षण देण्यासाठी काही पुढील उपाय सांगितले.

१. ज्या काही ग्रामीण भागात इंग्रजी शाळा सुरू आहेत त्या बंद कराव्यात.
२. कनिष्ठ वर्गातील शिक्षकांचीच निवड करावी. कारण त्या शिक्षकाला त्याची जाण असते व तो आपली मुले समजून त्यांना शिकवील.
३. मुलांसाठी वसतिगृहे काढावीत व शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण द्यावे.
४. गरीब वर्गातील मुलांना पाट्या, पुस्तके, वही पेन मोफत द्यावेत.
५. कनिष्ठ समाजातील किंवा वर्गातील शिक्षकाला प्रशिक्षण द्यावे.

**शेती सुधारणेसाठी उपाययोजना :**

भारतीय शेतीची उत्पादन कमी असण्याची अनेक कारणे म. फुले यांनी वरीलप्रमाणे नमूद केली आहेत. म्हणून शेतीची उत्पादकता वाढवावी, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवावे यासाठी म. फुले यांनी पुढीलप्रमाणे शेती सुधारणेसाठी उपाययोजना सांगितली आहे.

१) **शेतीसाठी पाणीपुरवठा योग्य रीतीने करावा :** भारतीय शेती कोरडवाहू आहे. निसर्गाच्या लहरीवर भारतीय शेती अवलंबून आहे. त्यामुळे म. फुले म्हणतात की, ब्रिटिश सरकारने काळ्या व गोऱ्या लष्करातील पोलिस खात्यातील शिपायांकडून जागोजागी तलाव, बंधारे अशा प्रकारे बांधावेत की, वळणाचे पाणी एकंदर शेतात मुरून नंतर नदीनाल्यांत मिसळले जावे. असे केल्याने शेती सुपीक होईल. महात्मा फुले यांनी शेतीसाठी सिंचन व्यवस्था महत्त्वाची मानली आहे. कारण भारतीय शेती टेकड्या पायथ्याशी आहे. त्यामुळे टेकड्यांवर नद्या-धरणे बांधावीत. नदीचे पाणी विहिरीत साठवून फळबागांसाठी आणि शेतीसाठी त्याचा उपयोग करावा.

**२) शेतकरी वर्गाच्या मुलांना शेतीविषयक शिक्षण देणे :-** भारतातील शेतीची सुधारणा करण्यासाठी आणि शेतकरी वर्गाचे शोषण होऊ न देण्यासाठी शेतकरी वर्गांना शेतीविषयक शिक्षण देणे फार महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर त्याच्या मुलांना शेतीविषयक शिक्षण देणे. कारण या शिक्षणामुळे शेती उत्पादनाच्या बाबतीत त्यांना पूर्ण ज्ञान प्राप्त होईल आणि शेतीही ते व्यावसायिक दृष्टीने करतील.

**३) नवीन ज्ञानाचा वापर :-** भारतीय शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रगत देशांत शेतकरी शेतीसाठी जे तंत्रज्ञान वापरतात त्याचा भारतीय शेतकरी वर्गाला शासनाने त्याचा फायदा करून द्यावा. तसेच शेतकऱ्यांना कृषिविषयक शिक्षण व प्रशिक्षण द्यावे. कोणत्या शेतजमिनीत कोणती पिके घ्यावीत याचे मार्गदर्शन करावे. इतर देशांत शेतीविषयक नियतकालिके व माहिती प्रकाशित होते ती भारतीय शेतकऱ्यांना उपलब्ध

करून द्यावी. त्याचा आपल्या शेतीमध्ये शेतकऱ्यांना प्रयोग करता यावा यासाठी सर्व शेतकऱ्यांना शिक्षण देऊन किंवा साक्षर करावे.

४) **सरकारचे प्रोत्साहन** :- आपल्या देशातील जे लोक शेती क्षेत्राचा विकास करत असतील तर त्यांना सरकारने प्रोत्साहन द्यावे. भारतातील शेती ही कोरडवाहू आहे; पण भारतातील शेतीची सुधारणा व्हावी यासाठी महात्मा फुल्यांनी असे प्रतिपादन केले की, जे शेतकरी सरकारी मदतीशिवाय, मार्गदर्शनाशिवाय विहिरी खोदत असतील त्यांना उत्तेजनार्थ काही बक्षिसे द्यावीत. हे विचार दुसऱ्या शब्दांत म्हणजे आज शासन शेतकऱ्यांसाठ ज्या योजना राबवीत आहे त्यामध्ये विहिरी खोदण्यासाठी सरकार शेतकऱ्याला आर्थिक अनुदान देत आहे.

५) **पाण्याचे योग्य वाटप करावे** :- भारतामध्ये निसर्गाची कृपा फारच चांगली आहे. कारण भारतातील सत्तर टक्के भाग पाण्याने व्यापलेला आहे. त्याचबरोबर भारतातील नद्यांवर धरणे बांधून कालवे निर्माण करण्यासाठी सरकारने मोठे कर्ज उभारले. तसेच ब्रिटिश अधिकाऱ्यांना जास्तीचे पगार दिले. या कर्जाचा भार भारतीय अर्थव्यवस्थेवर पडला आहे. धरणातून पाण्याचे जे वाटप केले जात होते ते योग्य पद्धतीने होत नाही. पाणी वाटपात नियोजनाचा अभाव असे. पाण्याचे न्याय्य वाटप करण्यासाठी फुल्यांनी उपाय सुचविले. त्यांच्या मते शेतीच्या आकारमानाचा विचार करून सरकारने प्रत्येक शेतकऱ्याला पाण्याची तोटी बसवून द्यावी. त्यातून हवे तेवढेच पाणी शेतकरी घेतील. त्यामुळे पाणी सोडण्यासाठी कर्मचाऱ्याची गरज भासणार नाही आणि तो खर्च वाचेल.

६) **गाळ व खते मोफत द्यावीत** :- भारतामध्ये विहिरी खोद असताना व विहिरी बांधून काढणाऱ्या शूद्र शेतकऱ्यांस लहान-मोठी बक्षिसे सरकारातून देण्याची वहिवाट घालावी व एकंदर सर्व नदीनाले व तलावांतील साचलेला गाळ पूर्वीप्रमाणे शेतकऱ्यास फुकट नेऊ द्यावा व त्या गावची गायराने, सरकारच्या मालकीची कुरणे जनावरांना चारण्यासाठी शेतकऱ्यांना खुली करून द्यावीत. बियाण्यांचा व अवजारांचा वापर करणे, नव्या तंत्रज्ञानाने शेती उत्पादन वाढविणे इत्यादी गोष्टींवर महात्मा फुले यांनी जोर दिला आहे.

७) **कृषीवर आधारित उद्योगांची निर्मिती** :- भारतात शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग फारसे विकसित होऊ शकले नाहीत. त्यातच इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीमुळे यंत्रांचा वापर वाढला. तांत्रिक ज्ञानात सुधारणा झाली. वस्तूचा उत्पादनखर्च कमी झाला. भारतातील कच्चा माल इंग्लंडमध्ये पाठवून पक्क्या मालात रूपांतर करून तो भारतात आणून विकला जातो. भारतीय वस्तूंची मागणी त्यामुळे एकदम घटली. जे काही थोडे उद्योग देशात कार्यान्वित होते ते बंद पडले. यावर उपाय म्हणजे भारतातच आधुनिक तंत्रज्ञान व यंत्रे याचा वापर करून कृषी मालावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे स्थापन करावेत.

**संदर्भ सुची:**


**१) जागतिक आर्थिक विचारांचा इतिहास :-** डॉ. एस.एम. खंदारे
कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद

**२) शेतक-यांचा असूड** :- म. ज्योतिराव फुले खंड-६

**३) अर्थनिती आणि आर्थिक विचार** :- कविमंडन विजय